INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 6.865 (SJIF 2023)

# रंगनाथ पठारे यांच्या कादंबरीतील स्त्री- जीवन

## (Woman-life in Ranganath Pathare's Novel)

**मनोजकुमार कोसारे**
संशोधक विद्यार्थी,
संशोधन केंद्र,
तायवाडे कॉलेज, कोराडी,
नागपूर (महाराष्ट्र, भारत)

**डॉ. कोमल ठाकरे**
मार्गदर्शक,
संशोधन केंद्र,
तायवाडे कॉलेज, कोराडी ,
नागपूर (महाराष्ट्र, भारत)

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/11.2023-97759216/IRJHIS2311012**

***गोषवारा:***

*रंगनाथ पठारे यांच्या जवळपास सर्वच कादंबऱ्यांमधून स्त्री जीवनाचे वैविध्यपूर्ण दर्शन घडते एकंदरीत मराठी कादंबरी मध्ये रूढ असलेला चाकोरीबद्ध स्त्री जीवनचित्रणाचा प्रघात पठारे यांनी मोडीत काढला आहे. साचेबद्ध स्त्री जीवनचित्रणाला फाटा देत पठारे यांनी समाजवास्तवाधिष्ठीत स्त्री जीवन चित्रण आपल्या बहुतांश कादंबऱ्यांमधून मांडले आहेअशा प्रकारच्या रूढ चित्रण शैलीला फाटा देत स्त्री जीवनाचे चित्रण करणारे रंगनाथ पठारे हे एकमेव पुरुष कादंबरीकार आहेत स्त्रियांच्या अंतर्मनात चालणाऱ्या विविध भावभावनांचा वेध, त्यांच्या मनातील आंदोलने त्यांचे भावविश्व, त्यांची हतबलता, अतिशय प्रत्ययकारीपणे उलगडण्याचा प्रयत्न पठारे यांनी आपल्या कादंबरी लेखनातून केला आहे*

***सूचक शब्द:*** *स्त्री जीवन, शोषण, अत्याचार, समाजवास्तव, सामजिक – सांस्कृतिक पर्यावरण*

**प्रस्तावना :**

साठोत्तरी कालखंड हा मराठी कादंबरी प्रवाहाच्या स्थित्यंराचा कालखंड आहे या कालखंडात मराठी कादंबरीच्या रूपाविष्कारामध्ये अनेक महत्त्वाचे बदल घडून आलेले दिसतात. आज पर्यंत एका रुळालेल्या मळवाटेने चालणाऱ्या मराठी कादंबरीच्या कक्षा या कालखंडात विस्तारत जातांना दिसतात रंजनप्रधान, वर्णनात्मक दृष्टिकोनाला बगल देऊन वास्तववादी दृष्टिकोनातून लेखन करू पाहणाऱ्या लेखकांचा एक नवा वर्ग या कालखंडात पुढे आला या प्रवाहातील काहीसे उशिरा म्हणजेच १९८० च्या कालखंडात प्रकाश झोतात आलेले एक नाव म्हणजे रंगनाथ पठारे यांचे आहे १९८२ साली राजकीय घडामोडींचे दिग्दर्शन करणारी त्यांची 'दिवे गेलेले दिवस' ही कादंबरी प्रकाशित झाली. आणि तेथूनच भौतिकशास्त्राचे प्राध्यापक असलेल्या

रंगनाथ पठारे यांना कादंबरीकार म्हणून एक नवी ओळख प्राप्त झाली प्राध्यापक रंगनाथ पठारे यांनी एकूण सदतीस वर्षे भौतिकशास्त्राचे अध्यापन केले आहे. तरी देखील 'दिवे गेलेले दिवस' पासून सुरू झालेला लेखन प्रपंच 'सात पाटील कुलवृत्तांत' पर्यंत आणि त्यानंतरही अव्यवाहातपणे सुरू असलेला दिसून येतो.

रंगनाथ पठारे यांनी आजपर्यंत जवळपास पंधरा कादंबऱ्यांचे लेखन केले आहे.त्यांचे कादंबरी लेखन हे बहुकेंद्री स्वरूपाचे आणि समाजातील समकालीन समस्यांचा वेध घेणारे आहे. या त्यांच्या सर्वच कादंबऱ्यांमध्ये स्त्री पात्रांचे विशेष असे महत्त्व राहिले आहे. स्त्रिजीवनाविषयी विशिष्ट दृष्टिकोन त्यांच्या कादंबऱ्यांमधून प्रकट होताना दिसतो स्त्रियांचे जीवन, स्त्री मनाचा हुंकार, स्त्रियांच्या व्यथा, त्यांच्या सुप्त इच्छा, त्यांचे स्वत्व इत्यादी स्त्री जीवनाविषयीचे गहनचिंतन त्यांच्या कादंबऱ्यांमधून प्रकटले आहे स्त्री जीवनाच्या दृष्टिकोनातून त्यांच्या 'हारण', 'दु:खाचे श्वापद', 'त्रिधा', 'कुंठेचा लोलक' या कादंबऱ्या विशेष महत्वाच्या आहेत. रंगनाथ पठारे यांनी आपल्या लेखनातून सृजनशीलता आणि प्रयोगिकता आपल्या कथा– कादंबरीतून रेखाटल्या आहे स्त्री – पुरुष नातेसंबंध हा पठारे यांच्या लेखनाचा मध्यवर्ती आशय असल्याचा प्रत्यय त्यांच्या अनेक कादंबऱ्या मधून येतो."स्त्रियांसंबंधी मला काही प्रश्न आहेत व अनुषंगिक कुतूहलही. या सांस्कृतिक दमनात जगणारी स्त्री ज्या करारी कोरडेपणांने ही व्यवस्था टिकवते, त्यासाठी आपली चिवट ताकद कोणाला लावते.ती का ? आपण इथे दुय्यम आहोत शोषित आहोत हे लक्षात येऊनही ती हा सांस्कृतिक अवकाश का जतन करीत राहते ? या नैसर्गिकतेत तिच्या वाट्याला जबर भोगवटा आलेला असतो, तरीही त्यात सुखाचे कण वेचण्याचे बळ जे ती मिळवते, ते कुठून येते ?" [१] भूमिका स्त्रियांसंबंधी काही प्रश्न या लेखातून रंगनाथ पठारे यांनी मांडली आहे. एकंदरीत स्त्री जीवनाच्या कुतूहलापोटी स्त्रियांचे आंतरविश्व उलगडण्याचा प्रयत्न रंगनाथ पठारे यांनी आपल्या कादंबरीलेखनातून केला आहे

**हारण** :- हारण ही कादंबरी १९९० साली मॅजेस्टिक प्रकाशनने प्रकाशित केली आहे. ही कादंबरी स्त्री मनाचा ठाव घेणारी कादंबरी आहे. ही कादंबरी हारण नावाच्या केंद्रका भोवती फिरताना दिसते. तारुण्यापासून तर अगदी शेवटपर्यंत तिचे सौंदर्य तिच्यासाठी शापच ठरले आहे. हारण ही या कादंबरीतील रूपवान नायिका, हारण ही धनगर समाजात जन्मलेली नायिका आहे. हिरामण खाडेच्या दहा मुलांपैकी पाचव्या क्रमांकाची, दारूच्या आहारी गेलेल्या हिरामणने त्याच्या चारही मुलींचे विवाह द्याज (वधूमूल्य) घेउन केले आहे. सातशे रुपये द्याज च्या लोभापायी रूपवान हारण चा विवाह सोळा सतरा वर्षांनी थोराड असलेल्या किरकोळ प्रकृतीच्या नारायण खेमनर सोबत लावून देतो. "गडी माणसाच्या रूपाला काय चाटायचं ? दोन वेळची आमटी भाकरी व वर्षा सहा महिन्यांनी लुगडं चोळी जो बिनबोभाट देऊ शकतो तो योग्य असाच वर होता!"[२] अशा प्रकारची समजूत असलेल्या समाजात हारण सारख्या सौंदर्यवतीचा विवाह तोळामासा प्रकृतीच्या नारायण खेमनर सोबत होणे काही नवीन नाही. मुंबईतील गिरणीवरची नोकरी सोडून गावामध्ये स्थायिक होऊन गिरणीतील नोकरीचा फंड आणि मुंबईतील खोलीचे पैसे घेऊन गावात सावकारी व्यवसाय करताना नारायण दिसतो. बिडीच्या व्यसनाने छातीचा भाता झाला असल्याने नारायण हाडकुडा दिसतो. त्यामुळे तो हारण ला फारसे शरीरसुख देऊ शकत नाही तर तेलाच्या बाटलीवर बोट ठेवून थेंब वापरायला लावणारा नारायण प्रपंचात काटकसरीचा असल्याचे दिसतो. आपला चुलत भाऊ मधू खेमनर ने बायकोचा हात धरल्यावरही धंद्यातील नुकसानी पोटी

गप्प बसतांना दिसतो. तर मधू सोबत नेपाळ मध्ये गांजा पाठवायचा ट्रक पकडला गेल्यावर नारायण पूर्णपणे कंगाल होतो आणि गावात नव्याने आलेल्या हरिभाऊ सोबले कडून ५०० रुपये कर्ज घेतो. आणि कर्ज फेडू न शकल्याने नारायण नैराश्यात जातो. तो हारण आणि हरिभाऊ यांच्यावर संशय घेऊ लागतो घरातील दारिद्र्य आणि नारायणच्या व्यसनामुळे ती हरिभाऊ सोबत पळून जाते आणि निफाड शहरात स्थिर होतात. परंतु हरिभाऊ आपण विवाहित असल्याचे लपवून ठेवतात तर मधू खेमनर तुरुंगातून सुटून आल्यावर निफाड मध्ये जावून हारण ला रांड संबोधून तिची बेअब्रू करतो हरिभाऊ त्याचा खून घडवून आणतातहरिभाऊ च्या खुनानंतर हारण आपल्या मुंबईमधील भावाच्या आश्रयाला येते आणि तिथे ती एका शिक्षिकेच्या घरी धुनी भांडी करून शिक्षण घेत असते. शारदाबाई सबनीस यांच्यासोबत काम करताना गावातील कामावर असणारा फडणीस साहेब तिथे येतो आणि तिसऱ्यांदा हरण त्याच्या प्रेमात पडते आणि त्याच्याशी विवाह करते. परंतु फडणीस साहेबाचा देखील अपघातात मृत्यू होतो आणि पुन्हा हारण एकाकी होते. तर मुलगी समिंद्राच्या लग्नानंतर तिचा नवराही हारण वर अतिप्रसंग करू पाहतो. एकंदरीत 'हारण' या कादंबरीचा विचार करतांना असे लक्षात येते की, हारण नावाच्या नायिकेच्या माध्यमातून भारतीय समाज व्यवस्थेमध्ये एकीकडे स्त्रीला देवतेच्या दर्जा देऊन तिची पूजा केली जाते. तर दुसरीकडे प्रत्यक्षात तिची समाजामध्ये कशा प्रकारची विटंबना होऊ शकते याचे चित्र या कादंबरीच्या माध्यमातून रंगनाथ पठारे यांनी प्रतिनिधिक स्वरूपात उभे केले आहे भटक्या समाजातील हिरामण खाडे असो किंवा नारायण खेमनर, मधु खेमनर किंवा घरंदाज मराठा समाजातील हरिभाऊ सोबले किंवा हारणचा जावई असो, या साऱ्यांनीच तिची संबंध आयुष्यामध्ये प्रतारणाच केलेली आहे एकंदरीत संपूर्ण कादंबरीची कथानक पाहिले तर३५ वर्षाच्या कालखंडामध्ये एखाद्या स्त्रीच्या आयुष्याची किती परवड होऊ शकते याचे संसूचन या कादंबरी मधून प्रत्ययकारीपणे प्रकटले आहे यावरून लेखकाच्या चिंतनशील कल्पनाशक्तीचा प्रत्यय आपल्याला येतो.

**दु:खाचे श्वापद** : - रंगनाथ पठारे यांची दु:खाचे श्वापद ही कादंबरी शब्दालय प्रकाशन ने१९९५ साली प्रकाशित केली आहे. भारतीय समाज व्यवस्थेतील स्त्री जीवन हे कशा प्रकारचे असुरक्षित आणि अनाकलनीय आहे याचा प्रत्यय आपल्याला या कादंबरीतून येतो चिखलदरी गावातील मराठा एज्युकेशन सोसायटी च्या शाळेमध्ये शिक्षिका असलेल्या उल्हासबाई चत्तरया व्यक्तिरेखे भोवती कादंबरी फिरणारी आहे लहानपणी घडलेल्या काही कटू प्रसंगामुळे उल्हासबाईंना संसार आणि प्रपंचामध्ये कधीच रस राहिलेला नव्हता. त्यामुळे त्यांनी स्वतःहून लग्नानंतर नवऱ्याला सोडून दिलेले आहे उल्हासबाई या पुरोगामी नारी मंचच्या सदस्य आहेत अतिशय सुंदर आणि देखण्या असलेल्या उल्हासबाईंच्या प्रेमात कुणीही पडावं असं सौंदर्य उल्हासबाईंना लाभलं आहे कादंबरीचा निवेदक सुद्धा उल्हासबाईच्या प्रेमात पडला आहे.

बालपणी वयाच्या दहाव्या वर्षी जन्मदात्या बापाच्या लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या उल्हासच्या अंतर्मनावर न पुसता येणाऱ्या जखमा झालेल्या आहेत. मानसिकरित्या खचलेल्या या कोवळ्या मुलीच्या मनावर स्त्री-पुरुष संबंधाबद्दल अनामिक भीती तळ करून बसते. त्यामुळे तिचे शरीर आकुंचित होते आणि तिचे स्त्रीत्व उमलण्याआधीच खुरटून जाते त्यामुळे काही प्रसंगी ती शुचिते बद्दल अवास्तव आणि अतिरेकी कृती करताना दिसते. दिवसातून दहा-वीस वेळा हात पाय धुणे, दररोज दोन-चार हंडे पाणी ओतून स्वतःला स्वच्छ करणे, अशा प्रकारचे असाधारण असे वर्तन ती करताना दिसते. मराठा एज्युकेशन सोसायटीचे

संचालक दादासाहेब नरसाळे हे वर करणी समाजसेवक दिसत असले, तरी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून पैसा कमवणारे, कमवू पाहणारे एक प्रस्थ आहे. उल्हासबाईच्या सौंदर्यावर भाळून तिचा उपभोग घेण्याच्या आमिशाने तिला आपल्या शाळेमध्ये शिक्षकेची नौकरी देतात. आणि काही दिवसानंतर तिला शारीरिक सुखाची मागणी करतात उल्हासबाई ना कुठलीही कल्पना नसताना दादासाहेब तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न करतात. परंतु बालपणीच्या प्रसंगामुळे स्त्रीत्व गमावलेल्या उल्हासबाई वर त्यांना बलात्कार करणे शक्य होत नाही आणि शेवटी गुदमरून उल्हास बाई चा मृत्यू होतो.एकंदरीत उल्हास बाईच्या परिचयाचे असणारे दादासाहेबांच्या कॉलेजातील प्राध्यापक वालझाडे हे पुरोगामी नारी मंचाच्या माध्यमातून श्रीमती गोपाळे बाईंच्या मदतीने उल्हास बाई च्या मृत्यूचा छडा लावू पाहतात.परंतु आपली राजकीय महत्त्वकांक्षा साध्य करण्यासाठी गोपाळे बाई दादासाहेबांशी सेटलमेंट करून पंचायत समितीचे तिकीट मिळवितात आणि उल्हास बाईच्या खुनाचा छडा लावण्याचे काम वाऱ्यावर सोडून देतात.

उल्हासबाईचे सौंदर्य हेच त्यांच्यासाठी शाप ठरला आहे. त्यांच्या आयुष्यात आलेल्या चार पैकी दोन पुरुषां नी तिचे आयुष्य बेचिराख केले आहे. या कादंबरीत तिचा तीन पुरुषांशी प्रत्यक्ष संबंध आलेला आहे.तिच्या आयुष्यात आलेला पहिला पुरुष म्हणजे तिचा बाप, ज्याने तिच्या अबोध बालमनावर न पुसता येणाऱ्या जखमा करून तिचे स्त्रीत्व फुलण्याआधीच कुस्करून टाकले आहे. तर दुसरा पुरुष म्हणजे तिचा नवरा ज्याने तिच्या अंतर्मनावर झालेल्या जखमा ओळखून तिला मनाप्रमाणे जगण्यासाठी मोकळीक दिली आहे. तर तिसरा पुरुष हा दादासाहेबांसारखा नराधम आहे जो आपल्यापाशी पाशवी वासनापूर्तीसाठी तिचा खून घडवून आणतो आणि चौथा पुरुष हा या कादंबरीचा निवेदक आहे.जो की तिच्या मृत्यूचा छडा लावण्याचा प्रयत्न करतो आहे. एकंदरीत गोपाळे बाई या सुद्धा एक स्त्री असून आपल्या राजकीय आकांशापूर्तीसाठी एका स्त्रीवर झालेल्या अन्यायाचा छडा लावण्या ऐवजी त्या आपल्या इच्छा आकांक्षांना पूर्ण करण्यासाठी संकटात संधी शोधण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

**कुंठेचा लोलक** :- रंगनाथ पठारे यांची 'कुंठेचा लोलक' ही कादंबरी २००६ मध्ये शब्दालय प्रकाशन प्रकाशित केली आहे. या कादंबरीचे कथानक बाळू नेटके या प्रथमपुरूषी निवेदकाच्या निवेदनातून साकार झाले आहे.बदलत्या काळाबरोबर बदलत जाणारी मानवी नातेसंबंध आणि कुटुंब संस्था यांची जडणघडण आणि विघटन यावर भाष्य करणारी ही एक महत्त्वाची कादंबरी आहे.सोप्या मार्गाने पैसा कमावण्याची आसक्ती आणि त्यातून उद्भवणाऱ्या अनैतिक समस्या या कादंबरीतून पठारे यांनी चित्रित केल्या आहेत. या कादंबरीत बाळू नेटके हा निवेदक व्यवसायाने शिक्षक आणि सोबतच पत्रकारिता करतो. सदैव पैशाच्या मागे धावणारा बाळू आपली पत्नी रेवतीला शारिरीक सुख देऊ शकत नाही. आपल्याला लैंगिक आरोग्याकडे बाळू नेटके याचे कायम दुर्लक्ष झाले आहे परिणामी पत्नी रेवती

कुंटणखाणा चालवणाऱ्या पोपटीबाई च्या मदतीने फॉरेस्ट ऑफिसर फडतरे सोबत स्वतःची शारीरिक भूक भागविण्यासाठी शारीरिक संबंध ठेवते आणि त्याच्याकडून पैसे देखील घेते अशा प्रकारचा अनाचार या कादंबरीत घडतांना दिसतो.

पैशाच्या मागे धावणारा बाळू रेवतीला शारीरिक सुख देऊ शकत नाही. प्राथमिक अवस्थेमध्ये बाळू रेवतीला शरीर सुख

देऊ शकत नाही. म्हणून बाळूने दवाखान्यात जाऊन स्वतःचा इलाज करावा असे तिला वाटते परंतु पैशाच्या लोभाबाई बाळू मात्र तिच्या या गोष्टीकडे दुर्लक्ष करतो आणि ती अशा वाममार्गाला लागते. बाळू नेटकेने रेवतीला फडतरे सोबत प्रणयक्रिडा करतांना रंगेहात पकडल्यामुळे ती बाळू नेटकेलासोडून दुसरीकडे निघून जाते आणि सन्मानाने स्वाभिमानाने जीवन जगण्याचा प्रयत्न करते परंतु समाजातील विकृत प्रवृत्तीची माणसे तिला सन्मानाने जीवन जगू देत नाही. जीवनामध्ये पैसा कमविण्याच्या नादात कुटुंब, नातेसंबंध, जिव्हाळा, आपुलकी, नैतिकता यांची कशा प्रकारे धूळधान होऊ शकते. याचे संसूचन पठारे यांनी या कादंबरीत केले आहे. एकंदरीत या कादंबरीमध्ये बाळू नेटके, रेवती, फडतरे , कुंटणखाना चालविणारी पोपटीबाई अशा विकृत आणि अनैतिकते कडे झुकलेल्या व्यक्तिरेखा या कादंबरीमध्ये पठारे यांनी रेखाटल्या आहे

'हारण','दु:खाचे श्वापद', 'कुंठेचा लोलक', रंगनाथ पठारे यांच्या या तिन्ही कादंबऱ्यांचा स्त्री जीवनाच्या दृष्टिकोनातून विचार करताना असे लक्षात येते, की पठारे यांनी स्त्री जीवनजाणीवांच्या दर्शनाच्या संदर्भात आजपर्यंत चालत रुढ परंपरा नाकारली आहे रंगनाथ पठारे यांच्या बहुतांशी कादंबयांमध्ये प्रकटलेल्या स्त्री जीवन हे समकालीन समाज वास्तवाला धरून प्रकटले आहे त्यांच्या कादंबऱ्यातील स्त्री व्यक्तिरेखा या विविध अंगी सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणातून आलेल्या आहेत त्यांच्या कादंबरीतीलस्त्रिया या एक पतिव्रता, कुलीन घरंदाज स्त्रिया, शिक्षिका, वेश्याव्यसाय करणाऱ्या, नर्स, डॉक्टर, पोलीस समाजसेविका, इ. प्रकारच्या आहेत. पठारे यांच्या कादंबऱ्यांमध्ये आलेल्या मुख्य स्त्री व्यक्तिरेखांचे शोषण,फसवणूक आणि त्यांचा छळ हा एकापेक्षा अनेक व्यक्तींनी केला आहे. अशा प्रकारचे चित्रण त्यांच्या एकापेक्षा अनेक कादंबऱ्यांमधून प्रकटले आहे जवळपास त्यांच्या १४-१५ कादंबऱ्यांपैकी दहापेक्षा अधिक कादंबऱ्यांमध्ये स्त्री जीवनाला अतिशय महत्त्व देण्यात आले आहे पठारे यांचा स्त्री जीवनाविषयीचा दृष्टिकोन हा अतिशय व्यापक स्वरूपाचा आहे आणि तो वास्तवाला धरून आहे. यामध्ये कुठल्याही रंजणवादी दृष्टीला त्यांनी थारा दिलेला नाही. एकंदरीत स्त्री जीवन जाणीवांचा इतका खोलवरचा वेध घेणारे रंगनाथ पठारे हे एकमेव कादंबरीकार आहेत असे म्हटल्यास चुकीचे ठरू नये.

**संदर्भ ग्रंथ:**


1. पठारे रंगनाथ, सत्वाची भाषा, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र. आ. २००८, पृ. १७७
2. पठारे रंगनाथ, 'हारण', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्र. आ. १९९०, पृ. ४